# ठाणे महानगरपालिका, ठाणे
# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"
# अंतर्गत पदभरती जाहिरात

ठाणे महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाकडील "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" अंतर्गत खालील संवर्गातील रिक्त पदे ११ महिने २९ दिवस कलावधीसाठी कंत्राटी स्वरुपात व करार पध्दतीने एकत्रित मानधनावर भरणेकामी अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागिवण्यात येत असुन त्याकरीता पात्र व इच्छूक उमेदवारांडून त्यांचे अर्ज विहित नमुन्याम मध्ये ठाणे महानगरपालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पांचपाखडी, ठाणे (प)-४००६०२ येथे दिनांक २९/०८/२०२४ ते ०७/०९ /२०२४ पर्यंत अर्ज सादर करावे.

| अ. क्र. | पदनाम | एकूण रिक्त पदे | रिक्त पदांची प्रवर्गनिहाय संख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि. जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि. मा. प्र | इ. मा. व | सा. शे. मा. प्र | ईड ब्लु एस | खुला |
| १ | वैद्यकिय अधिकारी (Medical Officer) MBBS उमेदवार न मिळाल्यास BAMS | १२ | २ | १ | १ | १ | ० | ० | ० | २ | १ | १ | ३ |
| २ | परिचारीका (महिला) | ११ | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | २ | १ | १ | ३ |
| ३ | परिचरीका (पुरूष) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | बहुउद्देशीय कर्मचारी (Male MPW) | १२ | २ | १ | १ | १ | ० | ० | ० | २ | १ | १ | ३ |

ठाणे महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाकडील "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" अंतर्गत रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात http://www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

## १) वयोमर्यादा

१. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच वैद्यकीय अधिकारी (MBBS/BAMS) परिचरीका , बहुउददेशीय कर्मचारी या पदासाठी दि २८/०८/२०२४ रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादित असणे आवश्यक आहे.

२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई दि. २८ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार पदांसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ व अभियानातील इतर रूग्ण सेवेशी संबधित पदांसाठी (उदा. परिचारीका,

Scanned with OKEN Scanner

अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माता इ.) सेवा प्रवेश आणि सेवा समाप्तीची वयोमर्यादा खालील प्रमाणे राहील.

३. एमबीबीएस, विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहील व BAMS यांची वयोमर्यादा खुला ३८ व राखीव ४३ याप्रमाणे राहील. वय वर्ष ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडून शारिरीक दृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच पुर्ननियुक्ती आदेश देण्यात येतील.

४. मा. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई दि. ०५ जुलै २०२२ रोजीच्या पत्रानुसार बहुउददेशीय आरोग्य कर्मचारी (पुरूष) व परिचारीका या पदांसाठी अठरा वर्षापेक्षा कमी वयाचे नाहीत आणि अडतीस वर्षापेक्षा अधिक वयाचे नाहीत; परंतु राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

## २) अर्ज भरण्या बाबतच्या सूचना

१. सर्व उमेदवारांनी खालील नमूद गुगल लिंक वर ऑनलाईन गुगल फॉर्म मध्येच अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.अर्ज भरण्यासाठी गुगल फॉर्म लिंक- https://forms.gle/G64Cfh3QreLd1Dd88

२. उमेदवाराने स्वत: पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

३. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

४. अंतिम वर्षाचे CGPA / SGPA गुण ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अचूक नमुद करावे.

६. अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

७. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

८. अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचूक भरावी, एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

९. गुगल फॉर्म परीपुर्ण भरल्यावर त्याची प्रिंट काढावी.

१०. पुर्ण भरलेल्या गुगल फॉमची स्वसाक्षांकित प्रत व मुद्दा क्र. ७ नुसार सर्व कागदपत्रे ठाणे महानगरपालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पांचपखाडी, ठाणे (प) - ४००६०२ येथे (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) प्रत्यक्षात (By Hand) व कुरीअरने सादर करण्यात यावेत. दिलेल्या मुदतीनंतर सादर करण्यात येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. टपालाने / कुरीयरने सादर आलेले अर्ज विहीत कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.)

Scanned with OKEN Scanner

११. अर्जदाराने प्रत्यक्ष भरलेल्या गुगलफॉर्मची प्रत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास असा अर्ज अपूर्ण समजण्यात येऊन तो रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## ३) शैक्षणिक अर्हता/पात्रता-

| अ. क्र | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयमर्यादा | कामाचे ठिकाण व वेळ | प्रतिमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी (MBBS/ BAMS) | एकूण १२<br>SC – २<br>ST – १<br>VJA – १<br>NTB – १<br>OBC – २<br>SEBC – १<br>EWS – १<br>OPEN - ३ | MBBS, Clinical experience in Govt. and/or Private sector, And registration with MMC | किमान वय १८ वर्षे ते कमाल ७० वर्षे | "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" वेळ दुपारी २.०० ते रात्री १०.०० | रुपये ६०,०००/- |
| | | | MBBA उमेदवार न मिळाल्यास B.A.M.S experience in Govt and registration with MCIM | किमान वय १८ वर्षे ते कमाल वय खुला प्रवर्गाकरिता ३८ वर्ष, राखीव ४३ | | B.A.M.S पदवीधारक वैद्यकिय अधिकारी पदाकरीता केंद्र शासनाच्या CPHC च्या मार्गदर्शक सुचनांनुसार रुपये २५०००/- अधिक रुपये १५०००/- (PBI) कामावर आधारित मोबदला याप्रमाणे प्रति महिना रुपये ४००००/- मानधन |
| २. | परिचारिका (महिला) | एकूण ११<br>SC – १<br>ST – १<br>VJA – १<br>NTB – १<br>OBC – २<br>SEBC – १<br>EWS – १<br>OPEN - ३ | BSC Nursing | किमान वय १८ वर्षे ते कमाल ६५ वर्षे | "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" वेळ दुपारी २.०० ते रात्री १०.०० | रुपये २००००/- |
| ३. | परिचारिका (पुरूष) | एकूण १<br>OPEN - १ | BSC Nursing | किमान वय १८ वर्षे ते कमाल ६५ वर्षे | "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" वेळ दुपारी २.०० ते रात्री १०.०० | रुपये २००००/- |

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयमर्यादा | कामाचे ठिकाण व वेळ | प्रतिमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | बहुउद्देशीय कर्मचारी (पुरूष) | एकूण १२<br>SC – २<br>ST – १<br>VJA – १<br>NTB – १<br>OBC – २<br>SEBC – १<br>EWS – १<br>OPEN - ३ | 12 th Pass in Science +Paramedical Basic training Course OR Sanitary Inspector Course | किमान वय १८ वर्षे ते कमाल ६५ वर्षे | "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" वेळ दुपारी २.०० ते रात्री १०.०० | रुपये १८०००/- |

**सदर भरती प्रक्रियेमध्ये M.B.B.S. पदवीधारक उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल जर ते उमेदवार उपलब्ध न झाल्यास, "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" अंतर्गत वैद्यकीय अधिकारी M.B.B.S. पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ६ ते ११ महिन्यांकरीता B.A.M.S. पदवीधारक उमेदवारास वैद्यकीय अधिकारी या पदावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येणार आहे.**

१. शैक्षणिक अर्हतेबाबतच्या सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२. अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

३. अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावा, ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे.

४. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये संबधित संस्थेकडून प्रमाणित करून घ्यावे.

५. उमेदवारांनी फॉर्ममध्ये नमूद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

६. पात्र उमेदवारांनी नियुक्तीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

७. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातून प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

८. बहुउददेशीय कर्मचारी या पदाकरीता विज्ञान शाखेतून उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केलेली आहेत आणि विभागाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडून आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकिय मुलभुत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनटरी इन्सपेक्टर) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

## ४) अनुभव

१. MBBS अर्हता धारकांस शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये, त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२. इतर पदासाठी केवळ शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रकियेत करण्यात येईल. खाजगी, स्वयंसेवी संस्था, बाहय यंत्रणाव्दारे कार्यरत पदावर कामाचा अनुभवाचा विचार करणेत येणार नाही. समकक्ष कामाचा अनुभव ग्राहय धरणेत येईल. तसेच अनुभव प्रमाणपत्र सादर करताना संस्थेचे लेटर हेड, जावक क व अनुभव कालावधीचा स्वयंस्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे, नसल्यास अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येणार नाही. नियुक्तीच्या आदेशाच्या आधारे गुण दिले जाणार नाहीत.

३. अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशील नमूद करताना दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

४. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल, या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

## ५. संगणक अर्हता

१. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

## ६) कुटुंबाचे प्रमाणपत्र

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासून लागू करण्यात आली असून दि. २३/०७/२०२० पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.

२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने रूजु होण्या अगोदर सादर करणे अनिवार्य आहे.

## ७) अर्ज शुल्क

१. उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्ज शुल्क असेल. Any बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. "INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY THANE" बँक युनियन बँक ऑफ इंडिया खाते नं. ६२३३०२०१००१६२२८ वर जमा होईल.

२. राष्ट्रीयकृत बँकेचा (**Union Bank of India**) धनाकर्ष व इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही.

३. धनाकर्ष (Demand Draft) शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ते अर्ज अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

## ८) उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी

१. उमेदवाराने गुगल फॉर्म वर फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२. राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

## ९) निवड प्रक्रिया

१. सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या उमेदवारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार/गुणांकन पध्दतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकारी मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

२. उमेदवाराची निवड करावयाची असल्यास शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या समिती यांच्या मान्यतेने मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान , मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड गुणांकन पध्दतीने करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी/पदविका परीक्षतील अंतिम वर्षाचे गुण अतिरिक्त अर्हता विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

## १०) थेट मुलाखती

वैद्यकीय अधिकारी (MBBS/BAMS) हि पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) Subject Knowledge (१०)

२) Research & Academic Knowledge (१०)

३) Leadership Quality (१०)

४) Administrative Abilities (१०)

५) Experience (१०)

a) For Govt. Experience - २ marks for one year

b) For Private Experience - १ marks for one year

Total Experience - १० marks maximum

एकूण गुण – ५०

## ११) गुणांकन पध्दती

उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवावी.

Scanned with OKEN Scanner

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा.६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी. | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Promotion काढावे. (उदा.१. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Promotion = ६०*२०/१०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| एकूण | | १०० गुण |

१. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांचे जा. क्र राआसोमं/मनुष्यबळ पदभरती/१०६७०-११०१६/२०२३ दि. २७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचनांनुसार गुणांकन पद्धतीने पात्र उमेदवारांची करण्यात येईल.

२. गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असून त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश Mail द्वारे टपालाद्वारे निर्गमित करण्यात येतील.

३. गुणांकन पद्धतीनुसार भरण्यात येणाऱ्या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही.

## १२) सर्वसाधारण सुचना

१. सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत "संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी http://www.thanecity.gov.in संकेतस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णतः कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही. या पदाचा राज्यशासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्यशासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.

३. जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित ठोक मानधन आहे.

४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत मूळ कागदपत्रासह नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. (उमेदवाराने अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये व मुळ कागदपत्रांमध्ये पडताळणीच्या वेळीस तफावत आढळल्यास तसेच उमेदवाराने

Scanned with OKEN Scanner

कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करणेत येईल, अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश सुपुष्टात आणून, प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

५. फॉर्म भरल्यावर इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील कागदपत्रे १ ते १८ जोडण्यात यावीत. वैद्यकीय अधिकारी, परिचारीका (पुरुष), परिचारिका (महिला), बहुउद्देशीय कर्मचारी (पुरुष) या पदासाठी संकेत स्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे वरील अटी व शर्तीनुसार ठाणे महानगरपालिका, आरोग्य विभाग, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,पांचपखाडी, ठाणे (प)- ४०० ६०२ (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) या पत्त्यावर दिनांक २९/०८/२०२४ ते ०९/०९ /२०२४ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं ४.०० वाजेपर्यंत सादर करावे. विहित मुदतीत टपालाने, कुरीअरने अर्ज स्विकारले जातील.

**१) पुर्ण माहिती भरलेला फॉर्मची प्रिंट**

**२) वयाचा पुरावा**

**३) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षाचे प्रमाणपत्र)**

**४) गुणपत्रिका**

**५) कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable).**

**६) शासकीय/निमशासकीय / खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे**

**७) जात/वैधता प्रमाणपत्र**

**८) आवश्यकतेनुसार नॉन क्रिमीलेअर**

**९) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)**

**१०) आधारकार्ड**

**११) पॅन कार्ड**

**१२) सध्याचा फोटो**

**१३) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)**

**१४) वाहन चालविण्याचा परवाना**

**१५) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)**

**१६) फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र**

**१७) युनियन बँकेचा Demand Draft**

**१८) अर्ज, धनाकर्ष व आवश्यक कागदपत्रे एकाच लिफाफ्यात बंद करुन सादर करावे.**

**वैद्यकीय अधिकारी यांच्या मुलाखतीचा दिनांक** http://www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

जाहिरातीमधील पदसंख्या, आरक्षण यामध्ये बदल होऊ शकतो आणि त्यानुसार यामध्य वाढ/कमी करण्याचे अधिकार, तसेच विहित केलेला थेट मुलाखतीचा दिनांक व वेळ, ठिकाण इत्यादीमध्ये कोणत्याही टप्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना राहतील. सदर जाहिरात ठाणे महानगरपालिका नोटीस

Scanned with OKEN Scanner

बोर्ड आणि http://www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, सदरहू भरती प्रक्रिये संदर्भात अधिक माहिती सदरहू संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

गुगल फॉर्मचा अर्ज, धनाकर्ष व आवश्यक कागदपत्रे एकाच लिफाफयात बंद करुन सादर करावे. सदर लिफाफयावर अर्ज केलेल्या महानगरपालिकेचे नाव, अर्जदाराचे नाव व पदाचे नाव नमूद करावे. महानगरपालिकेचे नाव नमूद न केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समितीने राखून ठेवले आहेत.

सही/-
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

Scanned with OKEN Scanner